# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 24/08/2020 (सोमवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि.मी अंतरावर डोरली येथे दिनांक 23/08/2020 चे 11:30 वा. ते 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रदिप किसन भुरसे, वय 40 वर्ष, रा. डोरली यांचे घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी कपाटाचे कुलुप तोडुन स्टीलच्या डब्यात ठेवलेले नगदी 10,000/–रू. व दुसऱ्या डब्यात ठेवलेले सोन्या–चांदिचे दागिने कि. 33,500/–रू. असा एकुण कि. 43,500/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कामडी 9923123397 हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. खापा :– दि. 23/08/2019 चे 17:00 वा. चे सुमारास 20 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि शेत मालकाच्या फार्म हाऊस मध्ये एकटी असतांना आरोपी नामे– लक्ष्मण चौधरी, रा. वाकोडी याने तिला एकटी असल्याचे पाहुन पाणी मागण्याच्या बाहन्याने तिच्या घरात प्रवेश करून पलंगावर बसला व तिने पाणी आणुन दिले असता त्याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354 (अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजय बारई 982228972 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– दि. 22/08/2020 चे 20:30 वा. चे सुमारास 46 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि शौचास गेली असता आरोपी नामे– अनिल बादल चव्हाण, रा. पुसागोंदी याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ सुनिल बन्सोड 9764090208 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर